R.No. MHHMAR/25/A3029

E-mail:dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १४

दि. २१ डिसेंबर २०२५, वार : रविवार


पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## विज्ञान व नवोन्मेषातून मानवकल्याणाचा संदेश देणारे डॉ. माशेलकर यांचे कार्य प्रेरणादायी - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

मुंबई : विज्ञान, शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करून मानव कल्याणाचा जागतिक संदेश देणारे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर यांचे कार्य तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.




आंतरराष्ट्रीय मानवी एकात्मता दिनाचे औचित्य साधून इटरनल कॉर्पोरेट मीडिया प्रा. लि. व खपीळिीलपस खपवळर यांच्या संयुक्त विद्यमाने ताजमहाल पॅलेस, कुलाबा, मुंबई येथे आयोजित ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर व सुशिल बोर्डे यांच्या चीेश षीा डर्शीा षी चीेश : खपपीेींळेप'ी केश्र्र त्रीरळश्र या पुस्तकाचे प्रकाशन मंत्री चंद्रकांतदादा पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (खउढ) चे एमेरिटस प्राध्यापक पद्मविभूषण प्रा. डॉ. एम. एम. शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मुकेश डी. अंबानी, बजाज ऑटो लिमिटेडचे अध्यक्ष निरज बजाज, गोडरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे चेअरमन व एम.डी. नादिर गोदरेज, मॅरिको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मरिवाला, काइनेटिक ग्रीन एनर्जी अँड पॉवर सोल्युशन्सच्या संस्थापक व सीईओ सुलज्जा मोटवानी, इटरनल कॉर्पोरेट मीडिया प्रा. लि.चे चेअरमन कृपाशंकर तिवारी तसेच एमडी व सीईओ अलोक तिवारी यांच्यासह उद्योग, शिक्षण व संशोधन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले की, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची संकल्पना मांडल्यानंतर ती प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी डॉ. माशेलकर यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण क्षेत्रातील अनेक बदल, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रातील राज्याच्या धोरणाबाबतही केलेल्या मार्गदर्शनामुळे नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य आज देशात अग्रस्थानी असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. माशेलकर यांनी मिळविलेल्या ५४ डॉक्टरेट पदव्या हा देशातील अभूतपूर्व विक्रम असून साध्या पार्श्र्वभूमीतून जागतिक दर्जाचे वैज्ञानिक नेतृत्व उभे करणारा त्यांचा जीवनप्रवास युवकांसाठी दिशादर्शक असल्याचे श्री. पाटील म्हणाले. जागतिक स्तरावर सर्वोत्कृष्ट वैज्ञानिक म्हणून ओळख असलेल्या डॉ. माशेलकर यांचा हा प्रेरणादायी प्रवास असाच सुरू राहीला, तर भविष्यात त्यांना नोबेल पारितोषिक व भारतरत्न पुरस्काराने सन्मान होईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय मानवी एकात्मता दिनाच्या संदर्भात बोलताना मंत्री श्री. पाटील म्हणाले की, राष्ट्रनिर्मितीसाठी एकात्मता, समावेशिता आणि सामूहिक जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. दारिद्र्य, विषमता आणि सामाजिक आव्हानांवर मात करण्यासाठी विज्ञान, शिक्षण आणि नवोन्मेष प्रभावी ठरतात. विषमता असूनही समान संधी निर्माण करणे हा डॉ. माशेलकर यांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू असून तो युवक, स्टार्टअप्स, संशोधक आणि धोरणकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात लवकरच जिओ विद्यापीठ सुरू होणार असून या माध्यमातून युवकांना जागतिकस्तरावर आपली ओळख निर्माण करता यावी यासाठी नवनवीन आणि आधुनिक अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मंत्री श्री. पाटील यांनी आयोजकांचे अभिनंदन करुन राष्ट्रीय सेवा व एकात्मतेच्या भावनेतून सर्व मान्यवरांनी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक केले. 'द प्राईड ऑफ इंडिया डॉ. रघुनाथ मालशेकर' कॉफी टेबल बुक व 'दिव्य वैज्ञानिक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी आपल्या जीवन प्रवास उलगडून सांगितला व त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## आठवी अ.भा. बौद्ध धम्म परिषदेच्या सभा मंडप रोपन कार्यक्रमाचे आयोजन

लातूर : आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या सभा मंडपाच्या रोपन (प्रारंभ) कार्यक्रमाचे आयोजन आज रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.४५ वाजता महाविहार, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव, ता. जि. लातूर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून साहेबराव नरवाडे (उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर ग्रामीण), रामदास केंद्रे (सहाय्यक पोलीस निरीक्षक, गातेगाव), संजय सावंत (उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर) तसेच साधना पांडुरंग मगर (सरपंच, रामेगाव) उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून ते आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद व बौद्ध धम्म संवर्धन प्रचार चॅरिटेबल ट्रस्ट, लातूरचे संयोजक तथा सचिव आहेत. या महत्वपूर्ण कार्यक्रमास बौद्ध उपासक, उपासिका व नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांचे आज व्याख्यान

लातूर, (प्रतिनिधी) समाजवादी नेते ड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांना आज, रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी प्रदान केला जाणार आहे. त्यावेळी ते 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान देतील. हा कार्यक्रम सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृहात होणार आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री श्री दिलीपराव देशमुख व समाजवादी नेते श्री सुभाष वारे उपस्थित राहणार आहेत.

ड. मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर तर्फे हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षी स्वराज हंडियाचे संयोजक व भारत ओडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पन्नास हजार, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तो दिला जातो.

प्रशांत भूषण हे भारतातील सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ अधिवक्ता, लेखक, सामाजिक आणि जनहित याचिका (पीआयएल) लढवणारे प्रसिद्ध व सार्वजनिक हिताचे वकील आहेत. ते भ्रष्टाचार, राजकीय आणि प्रशासकीय दुरुपयोग, पर्यावरणीय समस्या आणि नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्यांचा कायदेशीर आवाज म्हणून ओळखले जातात.

या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ड. मनोहरराव गोमारे पुरोगामी मंचातर्फे करण्यात आले आहे.

## मुळशी तालुक्यातील भानुदास पानसरे यांच्यासह उबाठाचे अनेक पदाधिकारीही भाजपामध्ये

मुंबई-पुण्यातील शरद पवार गटाचे आमदार बापूसाहेब पठारे यांचे पुत्र सुरेंद्र पठारे, दिवंगत आमदार रमेश वांजळे यांच्या कन्या सायली वांजळे, माजी नगरसेवक सचिन दोडके, बाळासाहेब धनकवडे यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांनी आपल्या असंख्य समर्थकांसह शनिवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. पुण्यातील उबाठा गटाचे डॉ. अमोल देवडेकर आणि हडपसरचे प्रशांत तुपे यांच्यासह काँग्रेसच्या आजी माजी पदाधिका-यांनीही भाजपा मध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी आमदार संग्राम थोपटे, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, गणेश बिडकर, श्रीनाथ भिमाले, योगेश मुळीक, भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.




यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशेने होणारी वेगवान वाटचाल बघून या सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. भाजपावर विश्र्वास ठेवून हे सर्वजण पक्षात आले आहेत. या सर्वांना उचित न्याय आणि सन्मान दिला जाईल.

यावेळी केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले की, पुण्यातील समाजकार्यामुळे जनमानसात वेगळे स्थान असलेल्या मंडळींनी भाजपामध्ये प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाच्या राजकारणाच्या विचारधारेला पाठिंबा देत भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे पुण्यात भाजपाचे हात मजबूत झाले आहेत.

पुण्यातून शप राष्ट्रवादीतून भाजपा मध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये विकास दांगट, नारायण गलांडे, रोहिणी चिमटे, काँग्रेस नेते व माजी मंत्री वसंतराव चव्हाण यांचे पुत्र कणव चव्हाण, हडपसर विधानसभा मतदार संघातील काँग्रेसच्या सौ. वैशाली तुपे, विराजदादा तुपे, खंडू लोंढे, पायल तुपे, प्रतिभा चोरगे, शुभांगी होले (शिवरकर), राजेंद्र लोखंडे, बाबा शिवरकर, विद्यानंद बोंद्रे, इंदिरा तुपे आदींचा समावेश आहे.

मुळशी तालुक्यातील उबाठा गटाचे कार्यकर्ते व पंचायत समिती माजी सभापती भानुदास पानसरे, उपतालुका प्रमुख गणेश पानसरे, कृष्णकुमार पानसरे, शप राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष आनंद माझिरे, उपाध्यक्ष संतोष पानसरे, सरचिटणीस सुहास पानसरे, उपाध्यक्ष किरण मराठे आदींनीही या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

## लातूरमध्ये मटका, जुगार, गुटख्याचा सुळसुळाट ; नागरिकांत तीव्र नाराजी

लातूर :- लातूर शहर व जिल्ह्यात मटका, जुगार आणि गुटख्याचा अवैध व्यवसाय सर्रास सुरू असल्याने कायदा-सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. शहरातील विविध भागांसह ग्रामीण परिसरातही पानटपऱ्या, हॉटेल्स व वस्त्यांमध्ये गुटखा खुलेआम विकला जात असून मटक्याचे आकडे आणि जुगाराचे अड्डे निर्धास्तपणे सुरू असल्याचे चित्र आहे.



राज्य शासनाने गुटख्यावर बंदी घातलेली असतानाही लातूरमध्ये तो सहज उपलब्ध होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या अवैध व्यवसायामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून अनेक कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मटका व जुगारामुळे घरगुती वाद, आर्थिक अडचणी आणि गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे हे सर्व प्रकार पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास येत नसतील, असे मानणे अवघड असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे कारवाई अपुरी आहे की प्रभावी अंमलबजावणीचा अभाव आहे, असा प्रश्र्न उपस्थित केला जात आहे. अधूनमधून छापा कारवाया होत असल्या तरी त्या केवळ किरकोळ स्वरूपाच्या असून मुख्य सूत्रधारांवर ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी समरसिंह साळवे तसेच संबंधित पोलीस निरीक्षकांनी मटका, जुगार व गुटख्याविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

अवैध व्यवसायांची साखळी तोडून मुख्य सूत्रधारांवर गुन्हे दाखल करावेत, गुप्त माहितीच्या आधारे विशेष मोहिमा राबवाव्यात आणि कायद्याचा धाक निर्माण करावा, अशी अपेक्षा सजग नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास लातूरमधील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्र्न अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सोशल मीडिया जनजागृतीवर कु. अंजली तानाजी पाटील यांचे व्याख्यान संपन्न

अहमदपूर -अहमदपूर येथील प्रियदर्शनी विद्यालयात इयत्ता ८वी ते १०वी मधील विद्यार्थ्यांसाठी सोशल मीडिया जनजागृतीवर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले आणि सोशल मीडियाचा योग्य उपयोग मीडिया म्हणजे काय आणि दैनंदिन विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली सोशल चर्चा करण्यात आली सोशल मीडिया वापरावर अवलंबून असतो, यावर भर दिसणारी प्रत्येक गोष्ट खरीच असेल असे या सत्रामध्ये मोबाईल फोनचा वापर यावर मार्गदर्शन करण्यात आले सोशल जीवनात त्याचा वापर कसा होतो याची मीडियाचे फायदे व तोटे यावर सविस्तर हे एक साधन असून त्याचा परिणाम देण्यात आला सोशल मीडियावर नाही, याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले ऑनलाईन सुरक्षिततेचे महत्त्व व वैयक्तिक माहिती जपण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले सोशल मीडियाचा शिकण्यासाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग कसा करता येईल यावर उदाहरणांसह चर्चा झाली विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन व स्क्रीन टाइम नियंत्रित ठेवण्याचा संदेश देण्यात आला समारोपात सोशल मीडियाचा संतुलित व विचारपूर्वक वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.



महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

### लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद – नगरपंचायतींची आज मतमोजणी : जनादेशाचा फैसला

लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांची आज मतमोजणी होत असून, या निकालांकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असली तरी आजचे निकाल केवळ विजयी–पराभूत ठरवणारे नसून, जनतेच्या अपेक्षा, नाराजी आणि विश्र्वासाचे स्पष्ट प्रतिबिंब असणार आहेत.

जिल्ह्यातील **निलंगा, औसा, अहमदपूर, उदगीर नगरपरिषद तसेच रेणापूर नगरपंचायतीच्या निकालांमधून जिल्ह्यातील स्थानिक राजकारणाची दिशा स्पष्ट होणार आहे. काही ठिकाणी झालेली मोठी मतदान टक्केवारी ही मतदारांच्या वाढलेल्या जागृतीची खूण आहे, तर काही ठिकाणी कमी प्रतिसादाने प्रशासन व राजकीय पक्षांसाठी प्रश्र्नचिन्ह निर्माण केले आहे.

स्थानिक मुद्द्यांवरचा कौल नगरपरिषद व नगरपंचायती या थेट नागरिकांच्या जीवनाशी जोडलेल्या संस्था आहेत. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, करआकारणी, घरकुल योजना आणि रोजगार यांसारख्या प्रश्र्नांवर मतदारांनी मतदान केले आहे. त्यामुळे आजच्या मतमोजणीतून समोर येणारा जनादेश हा कामगिरीला मिळालेला गुणपत्रक असणार आहे.

राजकीय पक्षांसाठी निर्णायक क्षण या मतमोजणीकडे सर्व राजकीय पक्ष ताकदीची चाचणी म्हणून पाहत आहेत. पक्षचिन्हांपेक्षा उमेदवाराची प्रतिमा, स्थानिक उपलब्धता आणि विश्र्वासार्हता किती महत्त्वाची आहे, हे निकालांमधून स्पष्ट होणार आहे. काही ठिकाणी बंडखोरी व गटबाजीचा फटका बसतो का, याचीही उत्तरे आज मिळतील.

विजयानंतरची खरी परीक्षा आज निकाल लागतील, जल्लोष होईल; परंतु खरी कसोटी उद्यापासून सुरू होईल. निवडून आलेल्या नगरसेवकांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून विकासाला प्राधान्य दिले नाही, तर आजचा जनादेश उद्या नाराजीत बदलायला वेळ लागणार नाही.

पराभवातून आत्मपरीक्षण जनतेने नाकारलेल्या उमेदवारांनी व पक्षांनीही या निकालांकडे प्रगल्भपणे पाहणे आवश्यक आहे. लोकशाहीत जनतेचा निर्णय अंतिम असतो. त्याचा स्वीकार करणे हीच लोकशाहीची ताकद आहे.

शेवटचा निष्कर्ष लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींची आजची मतमोजणी ही फक्त आकड्यांची गणिते नाहीत, तर लोकशाहीच्या आरशात आपली कामगिरी पाहण्याची वेळ आहे.

जनतेने दिलेला कौल विकासात रूपांतरित झाला, तरच या निवडणुकीचे खरे यश ठरेल. आजचा निकाल – उद्याच्या शहरांचा मार्ग ठरवेल.



फुले – शाहू, आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून खुर्दवाडी ता. औसा जिल्हा लातूर या ठिकाणी आमच्या शेतामध्ये दर्श वेळ अमावस्या साजरी करण्यात आली. यावेळी अनेक नातेवाईकांना, मित्रांना वनभोजनाचा आनंद घेण्यात आला. अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली

### महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतदान केंद्राची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द

लातूर/प्रतिनिधी :लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दिनांक १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधान सभेच्या मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजन करुन प्रारुप मतदार यादी तयार करुन ती दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीवर दिनांक ०३/१२/२०२५ पर्यंत हरकती व सुचना मागविण्यात आले होते. त्यांनंतर अंतिम मतदार यादी मा. राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त होऊन दिनांक १५/१२/२०२५ रोजी सकाळी प्रसिध्द करण्यात आली आहे.

मा.राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशान्वये अंतिम मतदारयादी नंतर मतदान केंद्राची यादी दिनांक २०/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिले आहे. तरी आज रोजी मतदान केंद्राची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर ालश्रर्ीीी.ीस वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

## पुढील अल्पकाळातील नोकरी आणि एआयची दुहेरी भूमिका

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयमुळे नोक–यांवर गदा येत असल्याचे अनेक रिपोर्ट्समधून समोर आले आहे. एआयमुळे अनेक कामे स्वयंचलित होत आहेत. त्यामुळे तरुणांना भविष्याचा प्रश्र्न सतावत आहे. एआयच्या मदतीने अत्यंत क्लिष्ट कामही आता शक्य झाल्याचे पाहायला मिळत आहे. एआय आता थेट विचारपूर्वक केल्या जाणा–या आणि विश्र्लेषणाशी संबंधित कामांना आवाहन देत आहे, त्यामुळे कार्यालयांमध्ये काम करणा–या कर्मचा–यांच्या नोक–यांवर सर्वात मोठा धोका निर्माण झाला आहे.

मागील औद्योगिक क्रांत्या पाहिल्या तर त्यांनी ज्या प्रकारचे बदल घडवून आणले, त्यातील बहुतेक बदल शारीरिक आणि मानवी श्रमाद्वारे केल्या जाणा–या कामांचं ऑटोमेशन करण्याशी संबंधित होते. एआयने आज असंख्य क्षेत्रामध्ये खळबळ निर्माण केली आहे. एआयमुळे अनेक नोक–यांवर परिणाम होत आहेच आणि भविष्यामध्येही असंख्य नोक–या एआयमुळे जाणार आहेत. त्यामुळे आज प्रत्येकजण आपल्या नोकरीबद्दल असुरक्षित वाटून घेत आहे. आयटी क्षेत्रात सर्वात जास्त एआयचा वापर केला जात आहे. त्यानंतर मीडियापासून ते उत्पादननिर्मिती क्षेत्रापर्यंत सर्वच क्षेत्रात एआयचा वापर वाढू लागला आहे. एआयमुळे नोकरीच्या क्षेत्रात प्रचंड बदल होत आहेत.

सध्याचे युग डिजिटलचे आहे. प्रत्येक गोष्ट ऑनलाईन होत आहे. या डिजिटल युगाचे जितके फायदे आहेत. त्यापेक्षा अधिक तोटे सहन करावे लागत आहेत. त्यातच बदलत्या तंत्रज्ञानाने अनेकांच्या जीवाला घोर लावला आहे. अनेकांच्या नोक–यांवर गदा येण्याची भीती आहे. येत्या ५ ते ६ वर्षांत एआय या नोक–या गिळंकृत करण्याची भीती आहे. कोणती आहेत ही क्षेत्र? तुम्ही जर त्यात काम करत असाल तर हे भाकीत समजून घेऊन पुढील नियोजन करायला पाहिजे.

मोठमोठ्या टेक कंपन्या टीसीएस, इंटेल, टेस्ला, गुगल, मेटा आणि इतर कंपन्यांनी एक लाखांहून अधिक लोकांना घरचा रस्ता दाखवला आहे. काही पदाचे काम एआय करत आहे. त्यामुळे जगातील काही क्षेत्रात मनुष्याची आणि त्याच्या श्रमाची किंमत अगदी झिरो होणार आहे. या क्षेत्रात एआयच्या मदतीने काम होणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात नोकरी करण्याची गरजच उरणार नाही. हे जॉब कायमचे बंद होण्याची भीती आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या 'फ्युचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५' नुसार येत्या ५ वर्षांत म्हणजेच २०३० पर्यंत जगात अनेक गोष्टी झपाट्याने बदलतील. एआयमुळे जॉब मार्केट जवळपास २२ टक्क्यांनी बदलेल. म्हणजेच येणारी वर्षे नोकरदारांसाठी आव्हानात्मक ठरेल. जगभरात थोड्या थोडक्या नाही, तर ९.२ कोटी नोक–या संपुष्टात येतील. येथील कर्मचा–यांना सहानुभुतीवर काही दिवस नोकरी करू दिले जाईल. पण त्यांच्या जागेवर नवीन कर्मचारी भरती करण्यात येणार नाही. तर काही नोक–या ताबडतोब बंद होतील. तिथल्या कर्मचा–यांना दुस–या खात्यात पाठवण्यात येईल अथवा घरचा रस्ता दाखवला जाईल.

यामध्ये पोस्टल सर्व्हिस क्लर्क, डाटा एंट्री ऑपरेटर्स, बँक टेलर्स आणि क्लर्क, रोखपाल, तिकीट क्लर्क, प्रिंटिंग आणि संबंधित कामगार, अकाऊंटिंग, बुककिपिंग, डमिनिस्ट्रेटिव्ह असिस्टंट, एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी, स्टॉक किपिंग, मटेरिअल रेकॉर्डिंग क्लर्क, डोअर टु डोअर सेल्स वर्कर्स, कंडक्टर, न्यूज वेंडर, दळणवळणातील काही नोक–या यासह इतरही काही नोक–यांवर गंडांतर येऊ शकते.

तर दुस–या बाजुला एआयमुळे काही कौशल्य आत्मसात करणा–या लोकांना नोकरी सुद्धा मिळाली आहे. काही नवीन नोक–या समोर आले आहे. कौशल्य विकासाद्वारे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्याची क्षमता, सध्या होत असलेल्या नोक–यांच्या नुकसानीपेक्षा कितीतरी पटीनं जास्त असेल. नवीन क्षेत्रांमध्ये नवीन प्रकारच्या नोक–या निर्माण करण्याच्या संधी अधिक आहेत आणि हे प्रामुख्याने कौशल्य विकास, प्रगत कौशल्य विकास आणि प्रतिभा विकासाच्या माध्यमातूनच शक्य आहे. त्यामुळे येत्या काही वर्षात नोक–यांचे जग संपूर्णपणे बदललेले असेल. तेव्हा या बदलाला सामोरे जाण्यासाठी तुम्हाला सुद्धा तुमच्यात बदल करावा लागणार आहे. नवीन कौशल्य शिकावं लागणार आहे.

म्हणजेच नोक–यांचे स्वरुप बदलेल. जुन्या आणि पारंपरिक कामांची जागा आता तंत्रज्ञान घेईल, तर एआय, बिग डेटा आणि सायबर सिक्युरिटी यांसारख्या क्षेत्रांमध्ये कुशल मनुष्यबळाची प्रचंड मागणी असेल. थोडक्यात, एआयमुळे नोकरीच्या बाजारात एक मोठी उलथापालथ निश्र्चित आहे. या बदलाच्या लाटेत टिकून राहण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी कर्मचा–यांना स्वत:ला सतत अपडेट ठेवणे आणि काळाची गरज असलेली नवीन कौशल्ये शिकणे अनिवार्य आहे.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

## बेसबॉल व सॉफ्टबॉल अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत महाविद्यालयाची उज्वल कामगिरी

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचालित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगावच्या विद्यार्थ्यांनी बेसबॉल आणि सॉफ्टबॉल या स्पर्धेत तृतीय आणि द्वितीय क्रमांक पटकावून उज्वल कामगिरी केली आहे.




राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झालेल्या अंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या बेसबॉल संघाने उल्लेखनीय कामगिरी करत गुणानुक्रमे तृतीय क्रमांक पटकावला तर सॉफ्टबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून उपविजेतेपद मिळविले. विविध महाविद्यालयांच्या बलाढ्य संघांमध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यांत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी संयम, कौशल्य आणि संघभावना यांचे उत्तम प्रदर्शन केले.

यशाबद्दल संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. आ. धीरज विलासराव देशमुख, सचिव शाम देशमुख, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. वैशाली माढेकर, संघाचे प्रशिक्षक बालाजी सुरवे, किशोर शिंदे, राहुल खुडे, प्रेमराज पौळ यांचे मार्गदर्शन लाभले होते. संघामध्ये विक्रम पवार, कार्तिक दळवी, मनोज स्वामी, सुरज मुदामे, ईश्र्वर मत्रट, विजय सुनापे, श्रीहरी शिंदे, गणेश पिठले, वाशिम तांबोळी, अभिजीत क्षीरसागर या खेळाडूंचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा महाविद्यालयामध्ये सत्कार करण्यात आला.

सत्कार प्रसंगी डॉ. जयदेवी पवार, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. अंगद कोते, डॉ. नानासाहेब जाधव, प्रा. शितल खोत यांची उपस्थिती होती.

## आसक्ती

जीवन दुःखमय आहे असे बुद्धाने सांगितले आहे. असे बऱ्याच वेळा काही प्रचाराकांकडून म्हटले जाते. मात्र त्यात तथ्य नाही. तथागतांची शिकवण पाहता, त्यांनी जीवनाकडे सकारात्मक कसे पाहायचे?, आनंदी जीवन जगण्याचा दृष्टिकोन कसा विकसित करायचा? खरे सुख कशात आहे? हे सांगितले आहे. बुद्धांनी जीवन फक्त दुःख आहे असे कधीही सांगितले नाही.

त्यानी दुःखाचे कारण सांगितले, ते म्हणजे आसक्ती!

आसक्ती म्हणजे एखाद्या व्यक्तीचा एखाद्या गोष्टीकडे, व्यक्तीकडे, सवयींकडे किंवा पदार्थांकडे होणारा अतिशय तीव्र, चिकटून राहणारा भावनिक किंवा मानसिक ओढा, ज्यामुळे ती गोष्ट सोडणे त्या व्यक्तीस कठीण होते. किंवा असेही म्हणता येईल की,ज्याशिवाय आपण राहू शकत नाही असे वाटणे, त्याचाच सतत विचार करणे आणि त्यामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होणे म्हणजे आसक्ती.

बौद्ध विचारात, आसक्ती (तृष्णा/उपादान) हे दुःखाचे मुख्य कारण मानले आहे.

बुद्धांनी आसक्तीवरील उपायही सांगितले आहेत. अनासक्ती म्हणजे एखाद्या गोष्टीला न चिकटणे, समतोल भाव ठेवणे. हे आसक्ती त्यागाचे महत्त्वाचा उपाय आहे. आसक्तीमुळे दुःख अस्तित्वात आहे. आसक्ती ओळखली, तिची कारणे शोधली तर दुःखावर मात करता येते.

यासाठी चार आर्य सत्यांचे योग्य आकलन होणे गरजेचे आहे. दुःख आर्य सत्य– जन्म, वार्धक्य, आजार, मृत्यू यात दुःख आहे. प्रिय वस्तू/व्यक्तीपासून दूर जाण्यात दुःख आहे.नको असलेले मिळण्यात दुःख आहे.हवे ते न मिळण्यात दुःख आहे.

बुद्ध इथे वास्तवाचे निरीक्षण मांडतात, निराशा पसरवत नाहीत.सुख आहे,आनंद आहे, मैत्री, करुणा, प्रेम, समाधान आहे. मात्र हे सर्व अनित्य आहे. स्थायी नाही आणि त्याला चिकटून राहिल्यास दुःख निर्माण होते.

तथागत गौतम बुद्धांनी दुःख का निर्माण होते आणि ते कसे थांबवायचे ? याची मानवाला अनमोल शिकवण दिली आहे. त्यासाठी त्यांनी आर्य अष्टांगिक मार्ग सांगितला आहे. त्या मार्गावर आरुढ होऊन जीवन सुखी करता येते.

जसे की आपल्याला सांगता येईल,आजार आहे (दुःख),
आजाराचे कारण आहे (तण्हा),
आजार बरा होऊ शकतो (निरोध)
आणि त्या आजारावर औषध आहे (अष्टांगिक मार्ग)

हा तथागतांचा सकारात्मक,सम्यक संदेश आहे.जीवन अंधकारमय नाही. जीवन निरर्थक नाही. त्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन हवा, की जो संम्यक मार्गाने विकसित होतो.जीवन सुधारता येण्यासारखे आहे.

गरज आहे मनाला प्रशिक्षित करण्याची. त्यामुळे दुःखातून मुक्ती शक्य आहे.

तृष्णा (तण्हा) ही दुःखाचे मूळ कारण म्हणून स्पष्टपणे वर्गीकृत केली आहे. ही वर्गवारी सूत्रपिटकातील अनेक सुत्तांमध्ये (विशेषतः सम्युत्तनिकाय व मज्झिमनिकाय) आढळते. काम तृष्णा, भवतृष्णा ,विभव तृष्णा असे तृष्णेचे तीन प्रकार सांगितले आहे.पण तिची रूपे असंख्य आहेत. तृष्णेचा निरोध म्हणजेच दुःखनिरोध.

तथागताची शिकवण कालसंगत आहे. ती समजून घेऊन मार्गक्रमणा करणे हेच उचित ठरेल.

**किशोर कासारे**
**मंडणगड (दाभट)**
**८७ ६७ ४२ ५१ ८०**

## संक्रमित मुलामुलींचा प्रश्र्न पुन्हा ऐरणीवर जिल्ह्यात उडाली खळबळ

लातूर : औसा तालुक्यातील




हासेगाव येथे आम्ही सेवक संस्था संचलित सेवालय एचआयव्ही संक्रमित मुला मुलींचे बालगृह चालविण्यात येत होते. गेल्या दहा पंधरा वर्षापासून ही सेवालय चालविले जात होते. सदरील सेवालय या संस्थेमध्ये संक्रमित पीडित मुलीवर अत्याचार प्रकरणी मागील चार महिन्यापूर्वी औसा पोलीस ठाण्यात पॉक्सो अंतर्गत सेवालयाचे संस्थाचालक रविकांत बापटले सह चार जनावर गुन्हा दाखल होताच जिल्ह्यासह राज्यात एकच खळबळ उडाली होती.

राज्याला हादरावरून सोडणाऱ्या घटनेने जिल्ह्यातील बालगृहातील मुला– मुलींचा प्रश्र्न ऐरणीवर आला. जिल्हा महिला व बाल विकास प्रशासनाने याची गंभीर दखल घेत प्रत्येक बाल ग्रहाची तपासणी, तेथील सुविधा, त्यांना होणारा छळ याची कसून चौकशी करण्यात आली. दरम्यान सेवालयाचीही कसून चौकशी करून सदरील अहवाल पुणे आयुक्ताकडे पाठविण्यात आले. सदरील अहवालाची पुणे आयुक्तांनी गंभीर दखल घेतली. यावरून महाराष्ट्र शासनाने दखल घेत आम्ही सेवक संस्था संचलित सेवालय एचआयव्ही संक्रमित मुला मुलींचे बालगृह हासेगाव ता. औसा जि. लातूर या संस्थेची अखेर मान्यता रद्द झाल्याबाबतच पत्र काढून सेवालयास मोठा दणका दिला आहे.

मान्यता रद्द.... मुला मुलींना इतरत्र हलविण्याची मागणी जोर वाढतोय..!

औसा येथील सेवालयात जवळपास ५० मुले मुली राहतात. सध्या परिस्थितीत काहीजण बाहेरगावी राहतात तर काहीजण इतरत्र राहतात. पण या सर्वांची नोंद मात्र सेवालयात अजून एक कायम असल्याचे बोललेले जाते. पण जे आहेत त्यांचे काय होईल..? असा प्रश्र्न पुन्हा निर्माण झाल्याने त्यांना इतरत्र हलविण्यात यावे अशी मागणी आता जोर धरत आहे.

सेवालयातील संस्थाचालकासह अनेकावर अनेक गुन्हे दाखल...

हासेगाव येथील सेवालयाचे संस्थाचालकावर सन २०२३ पासून ते २५ /७/ २०२५ पर्यंत म्हणजे दोन वर्षात पाच गुन्हे औसा पोलीस ठाण्यात दाखल झालेले आहेत. सदरील गुन्हे हासेगाव येथील जमिनीसाठी झाल्याचे दिसून येत आहे अशी चर्चा जोरात चालू आहे. सदर गुन्ह्यावरून असे दिसून येते की जर संस्थाचालकच दडपशाही गुन्हेगारी करत असेल तर सेवालयातील मुला मुलीवर सुद्धा दडपशाही, दबाव, गुन्हेगारी का झाली नसेल ? अशी शंका उपस्थित होताना दिसत आहे.

सेवालयातील अनेक मुले मुली सोडून गेले त्याचे काय कारण..?

याच सेवालयातील अनेक मुले मुली सोडून गेले आहेत याचेही संबंधित विभागाने चौकशी केली पाहिजे. सोडून का गेले? काय कारणे होती? त्यांना तिथे वागणूक व्यवस्थित मिळत नव्हती का? मग सर्व काही व्यवस्थित असेल तर मुले का निघून गेले आहेत? सोडून गेलेले मुला मुलींचा शोध घेऊन त्यांची चौकशी करण्याची गरज आहे. जेणेकरून सत्य बाहेर येईल. खरोखरच सेवालय सेवा देण्यासाठी आहे की आणखीन काय आहे असा प्रश्र्न सर्वसामान्य ऐकावयास मिळत आहे.

# नाव्होली शिवारात बिबट्या सदृश्य प्राणी दिसल्याने नागरीकांमध्ये घबराट!

केज/प्रतिनिधी-सद्या महाराष्ट्रात सर्वत्र बिबट्याने हैदोस घातला असून जंगल सोडुन हे प्राणी आता घाटमाथ्यावर आढळून येत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच आष्टी तालुक्यात बिबट्या असल्याच्या बातम्या सगळीकडे सोशल मिडिया आणि प्रिंटमिडीयाच्या माध्यमातून पहावयास मिळत आहेत. मोबाईल वर अशा घटना क्षणार्धात आपल्याला पहावयास आणि ऐकायला मिळत आहेत. त्यामुळे सर्वत्र नागरिकांमध्ये भितिचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच काल केज तालुक्यातील नाव्होली शिवारात शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना बिबट्या सारखा प्राणी दिसल्याने गावात आणि परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले असून याठिकाणी वनविभागाचे अधिकारी यांनी येवून प्रत्यक्ष पहाणी केली मात्र हा बिबट्या नसून तडस असु शकतो. तरी शेतकरी आणि नागरिकांना सावध राहाण्याचे आवाहन केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,सध्या महाराष्ट्रात सर्वत्र बिबट्याने हैदोस घातला असून तो आता बिड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात असल्याचे सांगितले जात असतानाच केज तालुक्यातील नाव्होली गावात बिबट्या आला असल्याची बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरली आणि शेतकरी आणि नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. १९ डिसेंबर रोजी गावापासुन एक किलोमीटर अंतरावर गावाच्या उत्तर दिशेला रात्री १२:३०वा. शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या एक महिला आणि त्यांचा मुलगा हे पाणी देत असताना थंडित शेकण्यासाठी मोठा जाळ केला होता. एवढ्यात त्यांच्या मागे काही अंतरावर काहीतरी असल्याचा भास झाल्याने त्यांनी हातातील बॅटरी लावली असता त्यांना बॅटरीच्या प्रकाशात मोठे डोळे चमकले काहीतरी मोठा प्राणी असल्याचा अंदाज येताच त्यांनी मुलाला सोबत घेऊन आपल्या मोटारसायकलवरून गावाकडे धाव घेतली याबबतची माहिती त्यांनी तात्काळ पोलिसांना दिली. तर सकाळी ९:३० ते १०:०० वाजण्याच्या सुमारास जाभंळीचे शेत नावाच्या शेतात नाव्होली गावातील शेतकरी नामदेव झाडे हे शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी गेले असता त्यांना शंभर मिटर अंतरावरून एक बिबट्या सदृश्य प्राणी झुलत झुलत चालला असल्याचे दिसून आले. हा नक्की बिबट्याचा आहे. अशी खात्री करून त्यांनी याबाबत माहिती गावचे सरपंच रंजित बिक्कड यांना दिली. सरपंच यांनी याबाबतची माहिती तहसीलदार , वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्याने सर्व यंत्रणा सतर्क झाली. हा हा म्हणता ही वार्ता सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली त्यामुळे गावात आणि परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती मिळताच धारुर वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी श्री.व्हि.एन.पवार आणि वनपाल अधिकारी एन.आर. पाईक हे नाव्होली येथील जांभळीचे शेत या घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी बिबट्या सदृश्य प्राणी पाहाणारे शेतकरी श्री. नामदेव झाडे यांना बोलावून घेत या घटनेबाबतची माहिती जाणुन घेतली असता त्यांच्या सांगण्यावरून हा बिबट्या नसुन तो तडस असण्याची शक्यता वर्तविण्यात आली. तसेच शेतात या प्राण्याच्या पायाच्या ठशाची पहाणी केली असता हा बिबट्या नसुन त्याचे पायाचे कुठेही ठशे आढळून आले नाहीत. तर वनविभागाचे अधिकारी या ठिकाणी येण्या अगोदर गावातील काही लोकांनी मोबाईल मध्ये त्याच्या कशाचे फोटो काढले होते. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी हे ठशे पाहिले असता हा बिबट्या नसुन तो तडस असण्याची शक्यता असल्याचे सांगितले. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी भिती मात्र मनात कायम असल्याचे दिसत आहे.




**मांजरा पट्ट्यात बिबट्याचा वावर नागरीकांनी सतर्क राहावे वनअधिकारी**

केज तालुक्यात जरी बिबट्या अजुनतरी कुठे आढळून आला नसुन फक्त सर्वत्र चर्चा सुरू आहे. बिबट.याने आत्तापर्यंत कुठेही कोणत्याही प्राण्यावर अथवा व्यक्तीवर हल्ला केला. नसुन अशी घटना घडली असल्याची अद्याप माहिती समोर आलेली नाही. मात्र मांजरा पट्ट्यात बिबट्याचा वावर असुन सध्या बिबट्याचा हा प्रजनन काळ असुन तो नोव्हेंबर, डिसेंबर दोन महिन्यांचा असतो तो सध्या त्यांचा हा. प्रजनन काळ साधारणतः १५ जानेवारीपर्यंत राहाण्याची शक्यता आहे. तसेच सध्या ऊसतोडणीचा हंगाम सुरू असल्याने त्यांना आता लपण्यासाठी जागा नसल्याने त्यांचा वावर हा माळरानावर दिसुन येत आहे. तरी या भागातील शेतकऱ्यांनी आणि जनतेने १५ जानेवारी पर्यंत शेतातील पिकांना रात्री पाणी देण्यासाठी जाण्याचे टाळावे. तसेच आपापले पशुधन सुरक्षीत ठिकाणी गोठ्यात बांधावे. शेतातील कामासाठी शक्यतो महिला ऐवजी पुरुषांनी जावे. रात्री शेतात गेल्यास हातात बॅटरी, काठी मोबाईल वर संगीत लावुन मोठ्या आवाजात ऐकवणे जेणेकरून बिबट्या पासून आपली सुरक्षा होईल.-एन.आर.पाईक वनपाल अधिकारी, व्हि.एन.पवार वनपरिमंडळ अधिकारी धारुर

# कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार घेऊन विद्यार्थ्यांनी कृतीशील व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर



केज/प्रतिनिधी- संत गाडगेबाबांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. विचारातून कृतिशीलता जपावी असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील भाऊसाहेब पाटील अध्यापक(बी एड) महाविद्यालयात संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.हनुमंत सौदागर, प्रमुख पाहुणे सरस्वती महाविद्यालयातील प्रा.डॉ. हरिदास शिंदे हे विचारपीठावर उपस्थित होते.

प्रा.बलाढ्ये यु.बी.,प्रा.कचरे जे. एस.,प्रा. लुंगारे एस.आर.,प्रा. जगदाळे एम.एच.,प्रा. चोले एन. जे.,ग्रंथपाल संतोष साळवी, सुजीत नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना डॉ.सौदागर म्हणाले संत गाडगेबाबा हे मानवतावादी संत होते जीवनभरात सेवेचा वसा घेऊन दिवसभर गावातील घाण साफ करून रात्री लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण साफ करण्याचे कार्य त्यांनी केले.

समाजसेवा सर्वश्रेष्ठ असल्याचा विचार त्यांनी दिला. त्यांच्या विचारातून देश घडत आहे.असे मत व्यक्त केले.छात्रअध्यापक परशुराम कचरे,शेख साहील या विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरविंद गायसमुद्रे,सतीश नेहरकर, यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे निधन



लातूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १९६० पासून पूर्णवेळ प्रचारक म्हणून कार्यास प्रारंभ करणारे मूळचे दुर्गानंद वासुदेव नाडकर्णी उर्फ स्वामी दुर्गानंद गिरी महाराज यांचे लातुरातील विवेकानंद रुग्णालयात सोमवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजून २१ मिनिटांनी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले. संघाशी असलेली आपली नाळ त्यांनी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत कायम जोपासली.

स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा जन्म १९३६ साली कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे झाला होता. सन १९४२ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला.

उच्च शिक्षणासाठी ते मुंबईत आले आणि सन १९६० मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी पूर्णवेळ कार्यास प्रारंभ केला. त्यांनी रा.स्व.सं.चे रत्नागिरी विभाग प्रचारक, मुंबई महानगर प्रचारक तसेच कोल्हापूर विभाग प्रचारक म्हणून विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. तसेच सुमारे नऊ वर्षे 'हिंदू एकजूट' या कार्यात त्यांनी सक्रिय योगदान दिले.

राम जन्मभूमी आंदोलनात स्वामी दुर्गानंद गिरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनेविरोधातील आंदोलनातही त्यांनी ठाम भूमिका घेत सक्रिय सहभाग घेतला. दरम्यानच्या काळात त्यांनी ऋषिकेश येथे संन्यास दीक्षा स्वीकारून 'पूज्य दुर्गानंद गिरी महाराज' हे नाव धारण केले.

सन १९९९ पासून ते लातूर येथे वास्तव्य करीत होते. ते अत्यंत कष्टाळू व साधे जीवन जगले.तहसील स्तरापासून ते प्रांत स्तरापर्यंत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य स्वयंसेवक व कार्यकर्त्यांच्या जडण घडणीत, संगोपनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली.


गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, श्रीपादजी नाईक, चंद्रकांतदादा पाटील, विनोद तावडे यांसारखे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या तालमीत घडले.

त्यांच्या सहवास व संपर्कामुळे अनेक कुटुंबांवर त्यांचा संस्कार झाला असून आजही त्यांची आठवण आदराने केली जाते.

स्वामी दुर्गानंद गिरी यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी सात वाजता औसा तालुक्यातील वानवडा रस्त्यावरील प्रा. उमाकांत होनराव यांच्या शेतात मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# भीमा कोरेगाव येथील १जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या शौर्यदिन कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाची काही शर्त -अटीसह परवानगी.

मुंबई : भीमा कोरेगाव (पेरणे) येथे प्रत्येक वर्षी १ जानेवारीला शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. १ जानेवारी १८१८ रोजी भीमा कोरेगांव येथे जुलमी आणि अत्याचारी पेशवाईचा अंत केल्याबादल या लढाईत ज्या शुरविरांनी शौर्य गाजवले अशा शूरवीर पूर्वजांना अभिवादन करण्यासाठी व शौर्याचे प्रतीक असलेल्या विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी लाखों आंबेडकरी अनुयायी भीमा कोरेगाव येथे येतात आणि आपल्या पूर्वजांना अभिवादन करून विजयस्तंभाला मानवंदना देऊन नव्या वर्षाची सुरवात करतात. भीमा कोरेगाव विजयस्तंभ व त्या परिसरात माळवदकर कुटुंबाने सात बारा वर स्वतः:चे कुळ लावून अतिक्रमण केले होते या विरोधात भीमा कोरेगांव विजयस्तंभ संरक्षण समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे सचिव रामदास लोखंडे, खजिनदार प्रा. दिलीप लोखंडे व ज्येष्ठ विश्वस्त सुदामराव पवार, सविताताई भोसले, धम्मपाल कांबळे, रवींद्र कांबळे व इतरांनी लढा दिल्यांनंतर २०१२ रोजी माळवदकर यांनी जे अतिक्रमण म्हणून काही बांधकाम केले होते ते तोडून टाकले. यानंतर माळवदकर कुटुंबाने भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक जागेचा सातबारा वर स्वतः:चे कुळ लावले होते त्या विरोधात भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी प्रशासकीय पातळीवर पत्र व्यवहार केल्याने ५/६/२०१७ रोजी तत्कालीन उपविभागीय अधिकारी ज्योती कदम यांनी माळवदकर कुटुंबाचे नाव कमी करण्याचे आदेश दिले व तशी तात्काळ कार्यवाही




करण्यात आली. माळवदकर यांनी या आदेशाविरोधात दिवाणी न्यायालयात (पुणे) येथे अपील केले पण दिवाणी न्यायालयात ते फेटाळले. यानंतर माळवदकर कुटुंबाने जिल्हा न्यायालयात पुणे येथे अपील केले तिथे पण फेटाळले या विरोधात माळवदकर कुटुंब मुंबई उच्च न्यायालयात गेले आहे सध्या हा खटला मुंबई उच्च न्यायालयात सुरू आहे. भीमा -कोरेगाव विजयस्तंभाची जागा ही न्यायालयीन वादात असल्याने प्रत्येक वर्षी १ जानेवारी शौर्य दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी मागील सात वर्षापासून मुंबई उच्च न्यायालयाकडून परवानगी घ्यावी लागते. या वर्षी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संदीप मारणे यांच्यासमोर सुनावणी झाली. .शासनाचे वकील व भीमा- कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे वकील श्री. रुपेश लांजेकर यांनी भीमा कोरेगाव येथील १ जानेवारी शौर्य दिनाला लाखों आंबेडकरी अनुयायी विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी येतात. आंबेडकरी जनतेच्या या विजयस्तंभाशी अत्यंत संवेदनशील भावना आहे. पूर्वजांच्या शौर्याच्या इतिहासाला मानवंदना देण्यासाठी लाखों अनुयायी संपूर्ण देश विदेशातून येतात आणि म्हणून या कार्यक्रमासाठी आपण परवानगी द्यावी अशा प्रकारचा युक्तिवाद मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संदीप मारणे यांच्यापुढे केल्यानंतर न्यायधीश संदीप मारणे यांनी सर्व बाजू ऐकून भीमा कोरेगाव येथील १ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या शौर्य दिनासाठी काही अटी व शर्तीसह परवानगी दिली आहे. शासनाला कार्यक्रमाची तयारी करण्यासाठी २२ डिसेंबर २०२५ पासून ते ५ जानेवारी २०२६ पर्यंत वेळ देण्यात आला असून मानवंदना देण्यासाठी आलेल्या अनुयायांना ३१ डिसेंबर २०२५ रात्री बारापासून प्रवेश देण्याची आदेश दिलेले आहेत. आंबेडकरी अनुयायांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे. सोशल मिडियावर किंवा कुणी काही बातम्या पसरवीत असतील तर कुणाच्याही अफवांना बळी पडू नये असे आवाहन भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी केले आहे. ३१ डिसेंबर रात्री १२.०० वां. पासून अनुयायांना मानवंदना देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. या सुनावणी दरम्यान शासनाचे प्रतिनिधी तसेच भीमा -कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग मुंबई उच्च न्यायालयात उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ४ नगरपरिषद, १ नगरपंचायत निवडणुकीसाठी २१ डिसेंबर रोजी मतमोजणी

लातूर :- जिल्ह्यातील निलंगा नगरपरिषद निवडणुकीसाठी ६७.३७, तर रेणापूर नगरपंचायत निवडणुकीसाठी ८०.५१ टक्के मतदान झाले. तसेच उदगीर नगरपरिषदेच्या तीन जागांसाठी ५८.२२ टक्के मतदान झाले.

निलंगा नगरपरिषदेसाठी झालेल्या मतदानामध्ये १६ हजार ४२९ पैकी ११ हजार २५९ पुरुष मतदारांनी, तर १५ हजार ७५६ पैकी १० हजार ४२४ महिला मतदारांनी म्हणजेच एकूण ३२ हजार १८५ पैकी २१ हजार ६८३ मतदारांनी मतदान केले.

रेणापूर नगरपंचायतीसाठी झालेल्या निवडणुकीत ८ हजार ४२० पैकी ६ हजार ८५६ पुरुष मतदारांनी, तसेच ७ हजार ८५७ पैकी ६ हजार २४९ महिला मतदारांनी म्हणजेच एकूण १६ हजार २७७ मतदारांपैकी १३ हजार १०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

उदगीर नगरपरिषद निवडणुकीसाठी आज झालेल्या तीन जागांच्या मतदानात ६ हजार १२१ पैकी ३ हजार ६९४ पुरुष मतदारांनी, तसेच ५ हजार ८८६ पैकी ३ हजार २९७ महिला मतदारांनी म्हणजेच एकूण १२ हजार ७ मतदारांपैकी ६ हजार ९९१ मतदारांनी मतदान केले.

जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, निलंगा, औसा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असून रविवार, २१ डिसेंबर रोजी सकाळी दहा पासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.